माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ६०५/२०२२**

**अपिलार्थी, श्री. सुभाष श्रावण सरोदे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सदर विभाग, नागपूर शहर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
परिमंडळ क्र.२, सिताबर्डी, नागपूर शहर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.१२.२०२१ | २०.०१.२०२२ | २४.०१.२०२२ | ०९.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १५.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "प्लॉट नं. २५, मौजा गोरेवाडा च्या अनुषंगाने स्टे असून कोर्टाची अवहेलना करुन बांधकाम सुरु आहे. करीता दि. २०.०७.२०२१ च्या अर्जानुसार संबंधित पोलीस निरीक्षक साहेबांनी जी कार्यवाही केली त्या कार्यवाहीबद्दल कागदपत्रासह माहिती देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. मानकापूर कडून प्राप्त माहितीनुसार अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहिती संबंधाने दि. २०.०७.२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी सुरु असल्याने मागणी केलेली माहिती पुरविणे शक्य नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २४.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०९.०२.२०२२ अन्वये, अपिलार्थी

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ ★ नागपूर ★

यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या अर्जानुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती योग्य आहे. परंतु अर्जदार यांनी पो.स्टे. मानकापूर येथे तक्रार अर्ज देवून ७ महिन्याचा कालावधी झाला असून चौकशी आजपावेतो प्रलंबित आहे. तरी चौकशी अधिकारी यांनी नमूद तक्रारीची चौकशी ५ दिवसांत पुर्ण करुन अपिलार्थी यांना तात्काळ माहिती पुरवावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०७.०३.२०२२ रोजी** " चुकीची माहिती दिली " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०७.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ०६.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, श्रीमती माधुरी बावीस्कर हया ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. ओमप्रकाश सोनटक्के, सहायक पोलीस निरीक्षक, पो.स्टे. सिताबर्डी, नागपूर हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. मानकापूर कडून प्राप्त माहितीनुसार अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहिती संबंधाने दि. २०.०७.२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी सुरु असल्याने मागणी केलेली माहिती पुरविणे शक्य नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०९.०२.२०२२ अन्वये, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या अर्जानुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती योग्य आहे. परंतु अर्जदार यांनी पो.स्टे. मानकापूर येथे तक्रार अर्ज देवून ७ महिन्याचा कालावधी झाला असून चौकशी आजपावेतो प्रलंबित आहे. तरी चौकशी अधिकारी यांनी नमूद तक्रारीची चौकशी ५ दिवसांत पुर्ण करुन अपिलार्थी यांना तात्काळ माहिती पुरवावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०२.२०२२ रोजी माहिती पुरविली आहे. त्यात दि. २०.०७.२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाचा चौकशी अहवाल व सयुक्तिक उत्तर अपिलार्थीस पुरविण्यात आले आहे. सदर प्रकरणी

प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार चौकशी करुन अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०६.०५.२०२४

जावक क्रमांक 4027 दिनांक 05 July 2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते